दैनिक
# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : ४ पुणे, शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५
पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.04. ISSUE : 4 Pune, Friday, 21 August 2025
Pages : 4 PRICE : 3.00

## महत्वाचे...

### मुंडेंनी अहवालाची फाइल गायब केली; अंजली दमानियांचा गंभीर आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी माजी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. मुंडे व्ही. राधा यांच्या अहवालाची महत्त्वाची फाइल गायब केल्याचा दावा दमानिया यांनी केला आहे. या प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. व्ही. राधा यांनी कृषी विभागातील आर्थिक गैरव्यवहारांचा तपशील असलेला अहवाल तयार केला होता. यात नॅनो युरिया, नॅनो डीएपी, बॅटरी स्प्रेअर आणि कापूस बॅगजच्या खरेदीत बाजारमूल्यापेक्षा जास्त किमतीने खरेदी झाल्याचे नमूद होते. हा घोटाळा सुमारे २७५ कोटींचा असल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केला होता. त्यानंतर आज दमानिया यांनी एक्स अकाऊंटवर एक पोस्ट केली. त्यात त्यांनी म्हटलं की, धनंजय मुंडेंनी, कृषी सचिव 'व राधा' यांची फाइल गायब केल्याचं म्हटलं.

### सुनेत्रा पवारांची संघाच्या कार्यक्रमाला हजेरी, राजकीय चर्चांना उधाण?

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) खासदार सुनेत्रा पवार यांनी नुकतीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यक्रमाला हजेरी लावली. हा कार्यक्रम अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रणौत यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. 'राष्ट्र सेविका समिती' च्या महिला शाखेच्या स्नेहमिलनाटा हा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाला सुनेत्रा पवारांनी हजेरी लावल्याने त्या चर्चेचा विषय ठरल्यात. कंगना रणौत यांनी या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. कंगनाने म्हटलं की, आपण एकत्रितपणे सनातन मूल्ये, हिंदू संस्कृती आणि राष्ट्रीय जाणीवेला अधिक प्रखर बनवूयात. मानवसेवा, राष्ट्र निर्माण आणि सनातन संस्कृतीच्या संरक्षणासाठी निरंतर कार्य करत राहण्याचा आम्हा सर्वांचा संकल्प आहे. महिलांची जागरूकता आणि त्यांचा सहभागच राष्ट्राला सशक्त बनवतो, असं कंगना यांनी म्हटलं.

### भाजप-राष्ट्रवादीच्या संघर्षाचा ट्रेलर लॉन्च?

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राज्यभरामध्ये महायुतीचं भवितव्य काय? असेल याबाबत अनिश्चितता आहे. पुण्यात मात्र भाजपच्या स्थानिक नेते मंडळीने जवळपास स्वबळावर निवडणूक लढवायची हे आपल्या मनाशी ठरवून टाकलं आहे. तसेच पुणे महापालिका निवडणुकीमध्ये खरं आव्हान हे महाविकास आघाडीतून नव्हे तर अजित पवारांचे असल्यामुळे त्या दृष्टिकोनातून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला कशा पद्धतीने खिंडीत पकडता येईल या पद्धतीने प्रभाग रचना बनवण्यात आल्याची चर्चा देखील सुरू आहे.

# 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन'च्या प्रकल्पात पुणे शहराचा समावेश

## 'शहरी पुर जोखिम व्यवस्थापन'अंतर्गत मिळाले २५० कोटी; ४००० प्रशिक्षित मनुष्यबळ केवळ कागदावर

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ( एनडीएमए) या प्रकल्पा अंतर्गत देशातील सात शहरांचा समावेश आहे. यामध्ये मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, अहमदाबाद, बंगलूरु, हैद्राबाद आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट ( युएफआरएम) प्रकल्पा अंतर्गत पुणे शहराकरीता पंधराव्या वित्त आयोगांर्तगत (सन २०२१-२०२२ ते २०२५-२०२६) पर्यंत प्रत्येक वर्षा करिता ५० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पा अंतर्गत अल्प व दिर्घ मुदतीचे स्ट्रक्चरल व नॉन

> "पुणे महापालिका राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था एनआयडीएम) शहराची आपत्ती आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगतात, मात्र, प्रत्यक्षात हा आराखडा पावसाळा संपल्यानंतर होणार का ?
> – विजय शिवले, सुराज्य सर्वांगिण विकास संस्था, पुणे,

> "पुणे शहरात पन्नास ठिकाणी फ्लड सेंसर बसविण्यात आले आहेत. पुणे शहर आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत महत्त्वाच्या वस्तूंची व उपकरणांची खरेदी केली आहे.
> – गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख, पुणे महापालिका

स्ट्रक्चरल उपायोजना करण्याच्या सुचना करण्यात आल्या होत्या. मात्र, नुकतच्या झालेल्या पावसानंतर पुणे शहरातील पुर स्थितीत महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापनाच्या भोंगळ कारभार समोर आला. त्यामुळे भविष्यात मोठ्या पावसामुळे पुरस्थिती उद्धवल्यास मालमत्तेच्या नुकसानासोबतच जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एनडीएमए) या प्रकल्पांर्तगत पुणे शहराचा समावेश आहे. अर्बन फ्लड रिस्क मॅनेजमेंट ( युएमआरएम) प्रकल्पा अंतर्गत पुणे शहरा करिता पंधराव्या वित्त आयोगांतर्गत २०२०- २०२१ पासून प्रत्येक वर्षाला पन्नास कोटी रूपयांचा निधी मिळत आहे. या निधी मधून महापालिकेने अल्प व दिर्घ मुदतीचे स्ट्रक्चरल व नॉन स्ट्रक्चरल उपायोजना करणे अपेक्षित होते. 'युएमआएम' अंतर्गत मिळालेल्या २८६ कोटी ७० लाख रूपयांच्या आराखड्यास राष्ट्रीय उप समिती व कार्यकारी समितीने

पान ३ वर...

### उपकरणे, सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी कागदावर

पुणे शहराकरिता आवश्यक रेनगेज स्टेशन, स्मार्ट सिटी अंतर्गत फ्लड सेंसरच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची खरेदी, वॉटर व मडपंप खरेदी करण्यार असल्याचे महापालिकेच्या २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकात उल्लेख हीं.मात्र, ही खरेदी कागदावरच आहे की खरेदी केली याचे उत्तर मात्र, गुलदस्त्यात आहे.

### ४००० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

आपत्ती व्यवस्थापन केंद्रांअंतर्गत पुणे महापालिकेच्या पंधरा महापालिका सहायक आयुक्त कार्यालयांसह पथ, मलनि:सारण, घरपाडी, विद्युत, पाणी पुरवठा, उद्यान, अग्निशमन, सुरक्षा, शिक्षण, आरोग्य अशा विभागातील तब्बल दोन हजार सेवकांचे गेल्या २ वर्षी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले. यावर्षी देखील दोन हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले. हे सर्व कर्मचारी शहरातील पंधरा महापालिका सहाय्यक आयुक्त स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन कक्षातील नियंत्रण कक्षाचे संचलनाचे करणार होते. मात्र, नियंत्रण कक्षातील दूरध्वनीच बंद असल्याचा अनुभव अनेक नागरिकांना आला.

# सिंहगडावरून युवक दरीत कोसळला

## मुसळधार पावसात आणि जोरदार वाऱ्यात घडले धक्कादायक हादरवणारे अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या पावसाळी हंगामात पर्यटनासाठी मित्र, कुटुंबीय आणि वेगवेगळे ग्रुप्स निसर्गरम्य ठिकाणी गर्दी करतात. त्याच दरम्यान, पुण्यातील प्रसिद्ध सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कड्यावरून एक २४ वर्षीय युवक खोल दरीत कोसळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बेपत्ता युवकाचे नावगौतम गायकवाडअसून तो हैदराबादहून मित्रांसह पर्यटनासाठी पुण्यात आला होता.

घटनास्थळावर मिळालेल्या माहितीनुसार, गौतम बुधवारी दुपारी सुमारे ४.३० वाजता मित्रांसह सिंहगडावर पोहोचला. सायंकाळच्या सुमारास तो तानाजी कड्याजवळ पर्यटनाचा आनंद घेत होता. त्यावेळी गौतमने मित्रांना सांगितले की

पान ३ वर...



## पुणे-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात; २ ठार

**पुणे प्रितिनिधी**

पुणे - सोलापूर महामार्गावर यवतजवळ अतिशय भयंकर अपघात झाला आहे. यवतमध्ये एका कारने दुभाजक ओलांडून दुसऱ्या बाजूच्या दोन आलिशान गाड्यांना जोरात धडक दिली. या विचित्र अन् भयंकर अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर ५ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर पुणे-सोलापूर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. यवत



पोलिसांनी तात्काळ घटनास्थळावर धाव घेतली अन् वाहतूक सुरळीत केली. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला केली. त्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमासाठी पाठवले. या अपघातातील मयतमध्ये उरुळी कांचन व यवत येथील दोघांचा

पान ३ वर...



## पुण्यात रस्त्याच्या मधोमध मानवी सांगाडा?

### घाबरू नका, सापडलं 'आर्टिफिशियल'!

**पुणे । प्रतिनिधी**

नगर रस्त्यावरील शास्त्रीनगर चौकात शुक्रवारी दुपारी अचानक एक विचित्र घटना घडली. रस्त्याच्या मधोमध मानवी सांगाडा दिसल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

रस्त्याजवळ येणाऱ्या वाहनचालकांनी अचानक ब्रेक लावले, तर पायी जाणारे नागरिक सुद्धा थांबले. काही वेळातच घटनास्थळी मोठी गर्दी जमली आणि वाहतूक ठप्प झाली.

पान ३ वर...

## वेल्हे तालुका आता 'राजगड' म्हणून ओळखणार

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील वेल्हे तालुक्याचे नवे नाव 'राजगड'अशी केंद्र सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर अधिकृत ठरले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रथम राजधानी असलेल्या राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी वेल्हे तालुका असल्यामुळे या नावांतराने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण अर्थ प्राप्त झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेऊन तालुक्याचे नाव बदलण्याची प्रक्रिया पूर्ण केली. वेल्हे तालुक्यातील ७० पैकी ५८ ग्रामपंचायती तसेच पुणे जिल्हा परिषदेने नाव बदलाच्या ठरावास मान्यता दिल्यानंतर महसूल विभागानेही मंजुरी दिली. आता



राजगड नावाला केंद्र सरकारची अधिकृत मान्यता मिळाली असून, लवकरच महाराष्ट्र सरकारचे राजपत्र प्रकाशित होणार आहे.

वेल्हे तालुक्यातील राजगड व तोरणा किल्ले अत्यंत महत्त्वाचे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगड किल्ल्यावरून २७ वर्षे स्वराज्याचा कारभार केला होता. या ऐतिहासिक वारशाला सन्मान देत वेल्हे तालुक्याचे नाव बदलण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला.

अनेक वर्षांपासून वेल्हे तालुका व पुणे जिल्ह्याच्या नागरिकांची मागणीही होती की तालुक्याचे नाव 'राजगड' ठेवावे. २२ नोव्हेंबर २०२१ रोजी पुणे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण

पान ३ वर...





## गणेशोत्सवात पुणे मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत वाढवली

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्योत्सव म्हणून मान्यता दिल्यानंतर पुण्यात उत्सवाचा जल्लोष जोरात सुरू आहे. शहरातील प्रमुख गणपती मंडळांभोवती लाखो भाविक दर्शनासाठी शहरात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे मेट्रोने प्रवाशांच्या सुविधेसाठी मेट्रोच्या वेळेत विशेष बदल केला आहे.

या वर्षी विशेष म्हणजे, जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो मार्गावरील भूमिगत मेट्रो सेवासुरू झाली आहे. या मार्गावरील जिल्हा न्यायालय, कसबा पेठ, मंडई आणि स्वारगेट या स्थानकांच्या सभोवताली शहरातील प्रमुख गणपती मंडळे

पान ३ वर...

## येरवड्यातील शांतीनगर मध्ये घुसले पुराचे पाणी तर लक्ष्मी नगर मध्ये दरड कोसळली

**पुणे । प्रतिनिधी**

धरण पाणलोट क्षेत्रात दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्याने पवना आणि खडकवासला धरणातून मंगळवारी सायंकाळी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा नदीत विसर्ग करण्यात आला.त्यामुळे विश्रांतवाडी येथील मुळा नदी पात्रा लगतच्या शांतीनगर,भारतनगर, कतारवाडी आणि इंदिरानगर झोपडपट्टी मध्ये नदीचे पाणी शिरले.त्यामुळे लोकांनी मौल्यवान आणि गरजेच्या वस्तू घेऊन घराबाहेर पडले.येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे पथक रात्री झोपडपट्ट्या मध्ये जाऊन लोकांना घरे सोडण्याचे आवाहन केले.नदीतील पाणी शिरल्याने अडीचशे कुटुंबांना शेजारील शाळा आणि समाज मंदिरात स्थलांतर केले.

येरवडा परिसरातील मुळा नदी पात्रा लगत शांतीनगर,कतारवाडी,भारत नगर आणि इंदिरानगर या मोठ्या आणि दाट लोकवस्तीची झोपडपट्टी आहे.पवना धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु केल्यावर या झोपडपट्ट्या मध्ये नदीचे पाणी शिरते.

पवना धरणातून मंगळवारी सायंकाळी मोठ्या प्रमाणावर नदीत पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला.त्यामुळे रात्री बारा वाजण्याचा सुमारास शांतीनगर आणि शेजारील झोपडपट्टी मध्ये पाणी शिरण्यास सुरुवात झाली.महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी येऊन स्पीकरवर घरे

पान ३ वर...

### स्मशानभूमी पाण्याखाली.

मुळा आणि मुठा नदी दुथडी भरून वाहू लागल्याने कळस,विश्रांतवाडी आणि येरवडा स्मशानभूमी पाण्याखाली गेल्या होत्या.पालिकेकडून नदी सुशोभीकरणाचे काम चालू असल्याने स्मशानभूमीतील शिरलेले पाणी वाहून जाण्यासाठी जागा नाही. त्यामुळे मृत्यू झालेल्या लोकांवर करसे अंत्यसंस्कार करायचे असा प्रश्न पडला आहे.
लक्ष्मीनगर येथे दरड कोसळली मात्र सुदैवान जीवित हनी झाली नाही



## तत्त्वांसाठी मरण्यासही तयार : थोरात

**पुणे । प्रतिनिधी**

किर्तनकार संग्राम बापू भंडारे यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना नथुराम गोडसे स्टाईलने धमकी दिली. याच्या निषेधार्थ आज (२१ ऑगस्ट) संगमनेरमध्ये विराट मोर्चा निघाला. या मोर्चातून थोरातांनी जनतेसमोर स्पष्ट सांगितले की, धमकीला मी घाबरणार नाही, तत्त्वांसाठी मरण्यासही तयार आहे. उमेदवार होण्याआधी कधी भगवी टोपी घातली होती का? हे नाटक कशासाठी. आम्ही अंत:करणातून हिंदू आहोत. पण आम्ही कोणाचा द्वेष करत नाही, असा टोला देखील थोरातांनी आमदार अमोल खताळ यांना लगावला आहे. मोर्चादरम्यान थोरात म्हणाले, मी स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा आहे. माझ्यासाठी तत्त्वं, विचार हे सर्वांत महत्त्वाचे आहेत. त्यासाठी मला मृत्यूला सामोरं जावं लागलं तरी मी तयार आहे.

## संपादकीय....

# लाडकी बहीण योजनेत विरोधाभास

## मेहनत करणाऱ्या महिलांना पगार कमी, घरबसल्या जास्त!

महाराष्ट्र राज्य कल्याणकारी असल्याची अनेक उदाहरणे आहेत. मात्र, याच राज्यात महिला व बाल विकास आयुक्तालय अंतर्गत विविध सरकारी व खासगी संस्थांमधील हजारो निराधार, अनाथ महिला मात्र, लाडकी बहीण योजने पासून वंचित आहेत. तर भिक्षेकरी स्विकार केंद्रातील महिलांना दिवसभर काम करून पाच रूपये मोबदला मिळतो. तर लाडकी बहिण योजनेत राज्य सरकार महिलांना काम न करता प्रतिदिन पन्नास रूपये अर्थात दीड हजार रूपये महिना भेट देणार आहे. हा विरोधाभास राज्यात दिसून येत आहे. आता तर जिल्हा परिषदेच्या शिक्षिकांनी लाडकी बहीण योजनेचा फायदा घेतला आहे.

राज्य सरकारच्या वतीने लाडकी बहिण योजनेसाठी युद्धपातळीवर महिलांची नोंद करण्यात आली.या योजनेत जास्तीत जास्त बहिणींना लाभ मिळावा म्हणून राज्य सरकार प्रयत्नशील होते. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद, महापालिकास्तरावर लाडकी बहिण योजने अंतर्गत महिलांची नोंद केली गेली. सर्व धामधुमीत कल्याणकारी सरकार असल्याचा डंका वाजविणाऱ्या सरकारच्या दिव्याखालीच अंधार असल्याचे दिसून येते. राज्यातील महिला व बाल विकास आयुक्ताल अंतर्गत सरकारी व खासगी संस्थांमध्ये हजारो निराधार, अनाथ १८ वर्षांपुढील युवती, महिला व ज्येष्ठ नागरिक आश्रयाला आहेत. या महिलांकडे मात्र , सरकारचे पूर्णत: दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. त्यामुळे गरजू व खऱ्या लाभार्थ्यांना लाडकी बहिणी योजनेचा लाभ मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे या महिलांना लाडक्या बहिणीचा लाभ मिळाल्यास भविष्यात त्यांना फायदा होऊ शकतो.

**भिक्षेकरी स्विकार केंद्रात काम करून प्रतिदिन पाच रूपये**

राज्यातील भिक्षेकरी स्विकार केंद्रात न्यायालयाच्या आदेशाने महिलांना दाखल केले जाते. या महिलांना शिवणकाम, झाडू बनविणे आदी कामे दिली जातात. या कामाच्या मोबदल्यात त्यांना प्रतिदिन पाच रूपये पगार दिला जातो. तर लाडकी बहिण योजने अंतर्गत महिलांना काम न करता प्रतिदिन पन्नास रूपये अर्थात महिन्याला दीड हजार रूपये पगार दिला जातो. हा विरोधाभास सरकार कसा दूर करणार हा मुख्य प्रश्न आहे. याचे उत्तर तरी आता राज्याच्या महिला व बाल विकास आयुक्तालाकडे नाही.

**कारागृहातील महिला कैद्यांना सुद्धा हवी लाडकी बहिण योजनेचा लाभ**

राज्यातील कारागृहातील महिला कैद्यांना सुद्धा लाडकी बहिण योजनेचा लाभ हवा आहे. कारागृहातील व खुल्या कारागृहातील महिलांना आठ तास काम केल्यानंतर ५५ ते ७२ रूपया पर्यंत प्रतिदिन मजुरी दिली जाते. त्यामुळे राज्यातील महिला कारागृहातील शेकडो महिला कैद्यांनी लाडकी बहिणी योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी करीत आहेत. या बाबत कारागृह प्रशासनाने कानावर हात ठेवले आहेत. महिला कैद्यांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळू शकत नाही, अशी भूमिका घेतली आहे.

**बऱ्या झालेल्या मनोरुग्ण महिला सुद्धा लाडकी बहिण योजनेपासून वंचित**

राज्यातील ठाणे, येरवडा, रत्नागिरी आणि नागपूर अशा चार ठिकाणी मनोरुग्णालये आहेत. या चार मनोरूग्णालयात बऱ्या झालेल्या शेकडो बऱ्या झालेल्या मनोरुग्ण महिला आहेत. या महिलांच्या पुनर्वसनासाठी रुग्णालया प्रशासन प्रयत्नशील असते. अशा महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाल्यास त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो. मात्र, या महिलाच लाडकी बहिण योजनेपासून वंचित ठेवले आहे.

**समाजकल्याणच्या वस्तीगृहातील विद्यार्थीनीही वंचित**

राज्यातील समाजकल्याण विभागांच्या वस्तीगृहात अनुसूचित जमाती व अनुसूचित जातीच्या अठरा वर्षांच्या पुढील हजारो युवती आहेत. या युवतींना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणार या बाबत समाजकल्याण विभाग संभ्रमावस्थेत आहेत. त्यामुळे राज्य सरकारची लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांची व्याख्या अधिक सविस्तर करण्याची आवश्यकता असल्याचे स्वयंसेवी संस्थांचे मत आहे. मात्र खिलाफत वाटले गेले आहे.

या विरोधाभासामुळे सरकारच्या कल्याणकारी प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना इतके कमी लाभ दिले जात असतील आणि घरबसल्या मिळणारा मोबदला त्याहून जास्त असेल, तर धोरणाचा मूळ उद्देश – गरजूंच्या जीवनात सुधारणा करणे – पूर्ण होत नाही. या विरोधाभासावर त्वरित सुधारणा करणे अत्यावश्यक आहे.

स्थानिक स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक या मुद्यावर लक्ष ठेवून आहेत. सरकारने लाडकी बहीण योजनेत गरजू व खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी तातडीने धोरणातील शिथिलता दूर करावी, अन्यथा योजना केवळ नांवापुरती मर्यादित ठरू शकते. वास्तविक बदलासाठी राज्य स्तरावर धोरणाचा पुनरावलोकन आवश्यक आहे.


# एक लाख १२ हजार वनस्पतींच्या नमुन्यांचे डिजिटायझेशन

## एकही रूपया खर्च न करता सहा महिन्यात विद्यार्थ्यांनी सरकारचे एक कोटी ६८ लाख रूपयांची केली बचत

महाराष्ट्र , गोवा व कर्नाटक या तीन राज्यातील तब्बल एक लाख १२ हजार वनस्पतींचे (हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन केले आहे. एक ही रूपया खर्च न करता विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सहा महिन्यात हे संकलन केल्याची माहिती भारतीय वनस्पती सर्वेक्षण (बॉटनिकल सर्वे ऑफ इंडिया) अर्थात बीएसआयचे प्रभारी अधिकारी डॉ. ए बेंनियामिन यांनी सागितले.

भारतात वनस्पतींचे असंख्य नमुने आढळतात. यातील अनेक नमुन्यांचा अजून शोध सुरूच आहेत. ' बीएसआय'ने महाराष्ट्र ? गोवा व कर्नाटक राज्यातील सह्याद्री पर्वत रांगेत, महाबळेश्वर, कोकण भागात अनेक दुर्मिळ वनस्पतीच्या नमुन्यांचे संकलन केले आहे. पुणे येथील बीएसआयने एक लाख १२ हजार वनस्पतींच्या (हर्बेरियम) संकलन केले आहे. या अमूल्य ठेव्याचे डिजिटायझेशन करणे आवश्यक होते. त्यासाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना आवाहान केले होते. याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.विद्यार्थ्यानी संगणकाच्या मदतीने प्रत्येक वनस्पतीचे छायाचित्रांसह माहितीची नोंद केली गेली. प्रत्येक बॅचमध्ये वीस विद्यार्थ्यांनी सोमवार ते शुक्रवार दरम्यान वनस्पतींचे डिजिटायझेशन केले. डिझिटायझेशनचे काम जर खासगी संस्थेला दिले असते तर त्यांनी एका वनस्पतीचे डिजिटायझेशनसाठी दीडशे रूपये दर आकारला असता. त्यामुळे एक लाख १२ हजार वनस्पतीचे एक कोटी ६८ लाख रूपये खर्च झाले असते. मात्र, विद्यार्थ्याच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे एकही रूपया खर्च करता आले नाही. सरकारचे पैसे ही वाचले व विद्यार्थ्याना वनस्पतींचा समृध्द खजीना अनुभवता आला. याचा उपयोग विद्यार्थ्यांना भविष्यात संशोधनासाठी होऊ शकतो, असे डॉ बेनियामिन यांनी सांगितले.

**डॉ. ए. बेनियामिन, प्रभारी अधिकारी, भारतीय वनस्पती सर्वेक्षण**








> **महाराष्ट्र, गौवा आणि कर्नाटक विविघ वनस्पतींनी समृध्द आहे. यातील अनेक वनस्पती दुर्मिळ आहेत. संशोधक आजही नवनवीन वनस्पतींच्या शोधात आहेत. भारतीय वनस्पती सर्वेक्षणकडे असलेल्या एक लाख १२ हजार वनस्पती ( हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन केले आहे. त्यामुळे पुढील कित्येक शतकानंतरही वनस्पतींची संपुर्ण माहिती एक क्लिकमध्ये मिळू शकते.**

### ऐंशी ते शंभर वर्षापूर्वीच्या वनस्पतीचे नमुने

**भारतीय वनस्पती सर्वेक्षणकडे महाराष्ट्रातीस अतिदुर्मिळ वनस्पतीचे नमुने संग्रहित आहेत. प्रत्येक वनस्पतीचे नमुने सुरक्षित लॉकरमध्यो ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे लुप्त झालेल्या वनस्पतीचे नमुने सुद्धा या ठिकाणी पाहण्यास मिळतात.**

## आठवणीतले पुणे...







१. कॅम्प परिसरातील घासीराम कोतवाल यांचा वाडा, आता तो सैन्यदल च्या ताब्यात आहे
२. महात्मा फुले मंडई
३. साठे बेकरीज लिमिटेड : स्थापना १ जून १९७३ : शक्ती ब्रेड व इतर बेकरी उत्पादने

# केबल मोबाईल कंपन्यांचे; भूर्दंड महापालिकेला!

## विजेच्या खांबावरुन बेकायदा केबलचे जाळे; उपनगरातील वास्तव

पुण्याचे उपनगर आता केवळ रहिवासी आणि वाहतूक यासाठीच नव्हे, तर मोबाईल कंपन्यांच्या ऑप्टीकल फायबर, तांब्याच्या ताऱ्यांच्या आणि केबल टीव्हीच्या वाहिन्यांच्या जाळ्यांसाठीही ओळखले जात आहे. महापालिकेच्या पथदिव्यांचे खांब आता या कंपन्यांसाठी 'तंत्रज्ञानाचे झाड' बनले आहे. दिवे आणि खांब यांचा वापर करून कंपन्या रात्रीच्या वेळी बिनविरोध केबल टाकत असतात, तर महापालिका प्रत्यक्षात या 'आधारे' होणाऱ्या आर्थिक नुकसानीकडे दुर्लक्ष करत आहे.

शहरातील पंधरा क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पथदिव्यांच्या खांबावरुन या केबल वाहिन्यांचे जाळे तुटत नाही, उलट वाढतच चालले आहे. दिवे तुटतात, खांब तिरप्या होतात, आणि काहीवेळा खांबावरून दिवे खाली पडतात. मात्र मोबाईल कंपन्यांना हा धोकाच काही वाटत नाही. रात्रभर एका खांबावरून दुसऱ्या खांबावर केबल ओढण्यात येतात; काही ठिकाणी खांब तिरप्या होतात तर दिवे पडतात, पण कंपन्यांच्या कर्मचार्यांना त्याची काही पर्वा नाही.

विद्युत विभागाला या जाळ्यांमुळे मोठा आर्थिक भूर्दंड बसतो. महापालिकेच्या गणनेनुसार, फक्त पथदिव्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. दिवे बदलण्यासाठी लागणारी सामग्री, कामगारांची मजुरी आणि तुटलेले खांब पुन्हा बसवण्याचा खर्च दरवर्षी करोडो रुपयांत मोजला जातो. तरीही, शहरातील उपनगरांतील अनेक भागांमध्ये मोबाईल कंपन्या आणि केबल टीव्ही वाहिन्यांच्या जाळ्यांसाठी खांब वापरत राहतात. नागरिकांनी या समस्येबाबत महा पालिकेकडे अनेक वेळा तक्रार केली आहे. पण आकाशचिन्ह विभाग, विद्युत विभाग आणि अतिक्रमण विभाग यामध्ये समन्वय न राहिल्यामुळे कारवाई फारशी होत नाही. नागरिकांच्या तक्रारींवर मात्र काही गंभीर प्रतिसाद मिळत नाही. उपनगरात रात्री वाहनांची संख्या कमी असते, त्यामुळे कंपन्या रात्रभर केबल टाकण्यात मोकळ्या आहेत.

केवळ मोबाईल कंपन्या नव्हे, तर काही माजी नगरसेवकांनीही आपली चमकोगिरी करण्यासाठी 'आय लव्ह' असे बिनविरोध विद्युत फलक पथदिव्यावर लावले आहेत. या फलकांसाठी वीज जोडली गेली असून, त्याचाही खर्च महापालिकेच्या खिश्यातुन जातो. विद्युत विभागाचे अधिकारी सांगतात की, या फलकांमुळे महा पालिकेच्या वीज बिलात दरमहाना मोठी वाढ होते.

### आय लव्ह...' फलकासाठी वीजचोरी!

**उपनगरांतील माजी नगरसेवकांनी चमकोगिरी करण्यासाठी चौकाचौकात बेकायदा 'आय लव्ह...'चे विद्युत फलक लावले आहेत. या फलकांना त्यांनी बिनदिक्कतपणे पथदिव्यातून वीज चोरी केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या दरमहा येणाऱ्या बीलाची रक्कम वाढली आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रीय कार्यालये, पथदिव्यांतून घेतलेल्या वीजजोडची यादी द्या, त्यावर कारवाई करुन वीजजोड तोडू टाकणार असल्याचे विद्युत विभागाचे कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.**

विद्युत विभागाने या सर्व खांबांवरील केबल, फलक आणि वाहिन्यांची नोंद घेऊन यावर कारवाई करण्याचे ठरवले आहे. उपनगरांतील पथदिव्यांवर कोणकोणत्या कंपन्यांनी वीज जोडली आहे, कोणत्या फलकासाठी आणि किती केबल लावली आहेत, याची संपूर्ण यादी तयार केली जात आहे. या यादीवरून वीज जोड तोडणे, फलक काढणे आणि बेकायदा वाहिन्या हटविणे यासाठी महा पालिकेतून कारवाई होणार आहे. पुण्यातील ही परिस्थिती केवळ आर्थिक नुकसानीपुरती मर्यादित नाही; शहराचे सौंदर्यही या जाळ्यांमुळे ढवळले आहे. पथदिव्यांच्या खांबावरुन केबल वाहिन्यांचे जाळे पसरल्याने शहरातील दृश्य अव्यवस्थित आणि असुरक्षित दिसते. दिवे तुटल्यामुळे रस्ते अंधारमय राहतात, नागरिकांसाठी चालणे आणि वाहतूक सुरक्षित ठेवणे कठीण होते. त्यामुळे या समस्येला तातडीने हाताळणे महत्त्वाचे आहे.

तसेच, नागरिक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांनी महा पालिकेला याबाबत सतर्क केले आहे. अनेकांनी म्हटले आहे की, मोबाईल कंपन्यांना पथदिव्यांचा वापर थांबवावा लागेल, अन्यथा शहरातील सौंदर्य आणि सुरक्षितता दोन्ही धोक्यात येईल. महापालिका आणि संबंधित विभागांनी एकत्र येऊन या समस्येवर तातडीने नियंत्रण ठेवावे, असा नागरिकांचा इशारा आहे. शहरातील उपनगरांमध्ये ३००-४०० किलो मीटर अंतरावरील रस्त्यांवर ही केबल वाहिन्यांची समस्या दिसते. यातून शहरात पसरलेल्या बेकायदा वाहिन्यांचा प्रमाण आणि आर्थिक नुकसान स्पष्ट होते. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महापालिकेला तत्पर कारवाई करणे गरजेचे आहे. शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, जर महापालिकेने आता योग्य ती कारवाई केली नाही, तर या प्रकारचा विरोधाभास आणखी वाढेल. मोबाईल कंपन्या व केबल टिव्हीच्या वाहिन्यांवर नियंत्रण न राहिल्यास, शहरातील पथदिव्यांचे नुकसान, अपघात, अंधारमय रस्ते आणि आर्थिक नुकसानीचा चक्र चालू राहणार आहे. विद्युत विभागाचे अधिकारी सांगतात, संपूर्ण यादी तयार केल्यावर उपनगरातील पथदिव्यांवरील बेकायदा केबल आणि फलक हटवण्यात येणार आहेत. नागरिकांनी सुरक्षिततेसाठी या कारवाईला सहकार्य करावे.

शेवटी नागरिकांचा आवाज असा आहे की, शहराचे सौंदर्य जपणे, अपघात टाळणे आणि महापालिकेच्या पैशांचा योग्य वापर सुनिश्चित करणे हाच या कारवाईचा मुख्य उद्देश असावा.

# डेक्कन कॉलेज पुरातत्व वस्तूंची रिप्लिका (प्रतिकृती) तयार करून विक्री करणार

## सिंधू संस्कृति व देशभरातील उत्खननात सापडलेल्या वस्तू घर व कार्यालयांच्या इंटिरियर मध्ये स्थान मिळविणार

सिंधु संस्कृतीची उदय हडप्पा व मोहेजदडो या शहरातून झाली. हे शहर स्थापत्यशास्त्राचा एक सुंदर नमुना होता. या शहराच्या उत्खननात अनेक प्राचिन वस्तू पुरातत्व विभागाला सापडल्या. यामध्ये मुर्त्या, माणिक व मोतीचे दागिने, भांडी, खेळणी, टेराकोटाच्या मुर्त्यांचा समावेश होता. अशा अनेक वस्तू डेक्कन कॅालेजच्या पुरातत्व संग्रहालयात आहेत. यासह महाराष्ट्रातील व देशभरात विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात शेकडो वस्तू सापडल्या आहेत. या वस्तूंचे पुरातत्वदृष्ट्या अधिक महत्व आहे. पण या वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) जर तयार केल्या तर त्याला मागणी मोठी असेल व त्यातून उत्पन्न सुद्धा मिळू शकते. त्यामुळे डेक्कन कॉलेज पुरातत्व वस्तूंच्या प्रतिकृती तयार करण्याच्या विचारात आहे.

> **डेक्कन कॉलेज पुरातत्व विभागात गेली अनेक वर्ष महाराष्ट्रासह देशभरातील उत्खननात अनेक वस्तू सापडल्या आहेत. अशा वस्तूंच्या प्रतिकृती (रिप्लिका) बनविण्याच्या विचारात आहोत. अशा वस्तूंना देश व विदेशात मोठी मागणी आहे. यातून लघुउद्योजकांना मोठी संधी मिळेल व कॅालेजच्या उत्पन्नात भर पडेल.**
> **डेक्कन कॅालेज, पुणे**

ग्रामिण असो वा शहर प्रत्येकाला घरात किंवा कार्यालयात शोभेच्या वस्तू ठेवण्यावर भर असतो. त्यात जर का वस्तू ही पुरातत्व काळातील असेल तर अशा वस्तू दर्शनी भागात ठेवण्यावर अनेकांचा भर असतो. आता तर कार्पोरेट युगात हस्तचित्र, पेटिंग, पोर्टरेट आणि रिप्लिंकाना अधिक महत्व दिले जाते. जगभरात या वस्तूंना प्रचंड मागणी आहे. त्यामुळे डेक्कन कॅालेज पुरातत्व विभाग त्यांच्याकडे असलेल्या शेकडो वस्तूंच्या प्रतिकृती ( रिप्लिका) तयार करणार आहेत. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना या वस्तूंच्या निर्मिती बरोबरच रिप्लिकांचे उत्पादन होणार आहे. यासह इतर लघु उद्योजकांना या वस्तूंच्या उत्पादनाची संधी मिळणार आहे.

### रिप्लिकांची ऑनलाईन विक्रीला मोठा प्रतिसाद

**देशभरात ग्रीक पॉटरी, कॅाईन्स, मूर्त्या, ब्रॅाझच्या मृर्त्या, टेराकोटाच्या मुर्त्या, माणिक व मोतीचे दागिने अशा अनेक वस्तूंच्या प्रतिकृतींचा ( रिप्लिका) यात समावेश आहे. या वस्तू एक हजारापासून ते लाखो रूपयांपर्यंत त्यांच्या किंमती आहेत.**

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे– ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

पान १ वरून

## पुणे–सोलापूर महामार्गावर भीषण अपघात; २ ठार

समावेश आहे. तर जखमींची नावे अद्याप समजू शकली नाहीत. उरळी कांचनमधील अशोक विश्वनाथराव थोरबोले आणि यवतमधील गणेश धनंजय दोरगे यांचा या अपघातात जागेवरच मृत्यू झाला. अपघातात मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत ज्ञानेश्वर विश्वनाथ थोरबोले यांनी यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार राकेश मारूती भोसले (रा. बोरीभडक ता. दौंड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास ज्ञानेश्वर थोरबोले हे त्यांच्या जवळ असलेल्या चारचाकी गाडीतून सोलापूरच्या दिशेने निघाले होते. यावेळी पुणे – सोलापूर महामार्गावरून राकेश भोसले हा सोलापूरच्या बाजूकडून पुण्याकडे निघाला होता. यावेळी त्याचे त्यांच्या लाल रंगाच्या गाडीवरील नियंत्रण सुटले व गाडी थेट दुभाजक ओलांडून समोरून येणाऱ्या दोन चारचाकी गाड्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात अशोक थोरबोले व गणेश दोरगे यांना जोरदार मार लागला होता. त्यांना तात्काळ नागरिकांच्या मदतीने यवत व उरुळी कांचन येथील रुग्णालयात दाखल केले असता दोघांचाही मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले.

## राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या प्रकल्पात पुणे शहराचा समावेश

मान्यता देखील दिली होती. पुणे महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रात सेवकांची चौवीस तास नेमणूक करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग मार्फत पुणे महापालिकेतील विविध विभाग, खात्यातील सेवक, कर्मचारी यांचे करिता जनजागृती, प्रशिक्षण, क्षमता व बांधणी आराखडा तयार करण्याचे नियोजन होते.

## सिंहगडावरून युवक दरीत कोसळला

तो लघवीस जात आहे, मात्र बऱ्याच वेळानंतरही तो परत आला नाही. मित्रांनी त्याचा शोध घेतल्यावर त्याची चप्पल हवा पॉइंटजवळ आढळली, पण गौतम दिसला नाही. सिंहगड परिसरात त्या दिवशी मुसळधार पाऊस आणि जोरदार वारा होता. मित्रांच्या मते, पावसामुळे आणि वाऱ्याच्या वेगामुळे गौतम पाय घसरून खोल दरीत कोसळला असावा. घटनास्थळीआपत्ती व्यवस्थापन कर्मचारी, ग्रामीण पोलीस आणि स्थानिक गिर्यारोहक कार्यकत रात्री उशिरापर्यंत शोधकार्य करत राहिले. अंदाजे एक हजार फूट खोल दरीत उतरून देखील रात्री ११ वाजेपर्यंत त्याचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. आज सकाळी ६ वाजता पुन्हा शोधकार्य सुरु केले असून, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथक नेहमीच्या पद्धतीपेक्षा अधिक सक्रियतेने पावसात, वाऱ्यात आणि खोल दरीत शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. सिंहगडाच्या साहसप्रेमी पर्यटनस्थळावर अशी घटना घडल्याने प्रशासनने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथक अद्यापही या तरुणाचा शोध घेत आहेत आणि घटनास्थळी सुरक्षा उपाय वाढवण्यात आले आहेत.

## वेल्हे तालुका आता 'राजगड' म्हणून ओळखणार

सभेत 'राजगड' नावाची शिफारस मंजूर झाली होती. त्यानंतर ५ मे २०२२ रोजी पुणे विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव सादर केला गेला. अखेर राजगड नावाला केंद्र सरकारची मान्यता मिळाल्यामुळे वेल्हे तालुका आता अधिकृतपणे 'राजगड' म्हणून ओळखला जाईल.

## पुण्यात रस्त्याच्या मधोमध मानवी सांगाडा?

सांगाड्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि नागरिकांमध्ये चर्चेला सुरूवात झाली की, हे खऱ्या मानवी हाडांचे सांगाडे आहे की नाही? या चर्चेने वातावरण थोडेच भितीदायक झाले. घटना लक्षात आल्यावर पोलिस ताबडतोब घटनास्थळी पोहोचले. येरवडा पोलिस स्टेशन हद्दीतील गोल्डन आर्क लॉज समोरील नगर रोडवर हा सांगाडा आढळून आला होता. घटनास्थळी छाती व कमरेच्या भागाचा सांगाडा पडला होता. पोलिस तपासात समोर आले की, हा सांगाडा प्रत्यक्ष मानवी नाही, तर प्रयोगशाळेत वापरण्यासाठी तयार केलेला 'आर्टिफिशियल सांगाडा' आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसने तयार केलेला हा सांगाडा तारेने बांधला गेला होता. कोणत्याही प्रकारचे संशयास्पद घटक त्यात आढळले नाहीत. पोलिसांनी नागरिकांना आश्वस्त केले की, घाबरण्याची काहीच गरज नाही. मात्र, हा प्रयोगशाळेतील सांगाडा रस्त्यावर कसा आला आणि कुणी ठेवला, याबाबत अजूनही प्रश्न उपस्थित आहेत. या घटनेने पुण्याच्या रस्त्यांवर नागरिकांची सतर्कता वाढवली, तर सोशल मीडियावरही चर्चेचा मोठा विषय ठरला आहे.

## गणेशोत्सवात पुणे मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत वाढवली

असल्याने, मेट्रो सेवा वापरून नागरिक मध्यवस्तीतील वाहतूक कोंडी टाळून थेट मंडई, कसबा पेठ भागात पोहोचू शकतील. मेट्रोच्या प्रवासी सेवेत केलेल्या बदलांनुसार, गणेशोत्सवाच्या पहिल्या तीन दिवसात (२७ ते २९ ऑगस्ट २०२५) मेट्रो सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत नियमित वेळेत सुरू राहणार आहे. ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान मेट्रो सेवा सकाळी ६ ते रात्री २ पर्यंतउपलब्ध असेल. तरअनंत चतुर्दशीच्या दिवशी (६ सप्टेंबर सकाळी ६) ते दुसऱ्या दिवशी रात्री ११ पर्यंतमेट्रो सेवा४१ तास अखंडसुरू राहणार आहे. दिनांक ८ सप्टेंबरपासून मेट्रो सेवा पुन्हा नियमित वेळेत सुरू होईल. मेट्रो प्रशासनाने सर्व भाविकांनागणेशोत्सवात मेट्रो सेवेचा लाभ घेऊन सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास करण्याचे आवाहनकेले आहे.

## येरवड्यातील शांतीनगर मध्ये घुसले पुराचे पाणी तर लक्ष्मी नगर मध्ये दरड कोसळली

सोडण्याचे आवाहन करीत होते.तरीही लोक घरे सोडून जाण्याची तयारी नव्हती.रात्री एक वाजण्याच्या सुमारास वेगाने पाण्याची पातळी वाढू लागल्यावर लोकांनी लहान मुले आणि मौल्यवान वस्तू घेऊन बाहेर पडले. महापालिकेच्या डॉ. नानासाहेब परुळेकर, वि. दा.घाटे कर्नल यंग आणि समाज मंदिरात विस्थापित कुटुंबाचे स्थलांतर करण्यात आले, अशी माहिती येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त अशोक भवारी यांनी दिली. बुधवारी पहाटेपासून पाण्याचा विसर्ग वाढल्याने शांती नगर मधील आणखीन काही घरात पाणी शिरले.रात्री बारा वाजता घरात पाणी शिरल्याने पूर्ण रात्र जागून काढावी लागली.दरवर्षी पावसाळ्यात नदीचे पाणी घरात शिरून संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान होते,असे स्थानिक महिला पुष्पा ओव्हाळ,रत्नमाला झेंडे,रेखा आल्हाट यांनी सांगितले.

# ५ हजार किमी रेंज असणाऱ्या 'अग्नी ५' मिसाईलची यशस्वी चाचणी

### ओडिशातील चांदिपूर येथील इंटीग्रेटेड टेस्ट रेंज केंद्रात संपन्न



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भारताने आज मध्यम अंतराची बॅलेस्टिक मिसाइल अग्नी ५ चं यशस्वी चाचणी केली आहे. ओडिशातील चांदिपूर येथील इंटीग्रेटेड टेस्ट रेंज केंद्रात ही चाचणी झाली.

पाकिस्तानमध्ये या मिसाईलची इतकी धडकी का याचा अंदाज यातून लावू शकतो की, चाचणीच्या एक दिवसाआधी इस्लामाबादच्या थिंक टँकने अग्नी ५ बाबत पाकिस्तानी सरकारला सतर्कतेचा इशारा दिला होता.

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे थिंक टँक स्ट्रॅटेजिक व्हिजन इन्स्टिट्यूटने अग्नी ५ बाबत पाकिस्तानच्या शहबाज शरीफ सरकारसोबतच आर्मी चीफ असीम मुनीर यांना सावध केले होते. डतठ ने म्हटलं होते की, जर भारताने या मिसाईलची यशस्वी चाचणी केली तर ती पाकिस्तानसाठी धोक्याची घंटा असू शकते. पाकिस्तान या मिसाईलची भीती यासाठी आहे कारण त्याची रेंज ५ हजार किमीहून अधिक आहे.

ही मिसाईल भारताच्या इंटरकॉन्टिनेंटल बॅलेस्टिक मिसाइल अग्नी ५ चा एक भाग आहे. त्याला भारताच्या संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने विकसित केले आहे. याला अपग्रेड करण्याची योजना बनवली होती, ज्याची मारक क्षमता ७५०० किमीपर्यंत वाढणार आहे असं सांगण्यात येते.



# पुणे घाट परिसरासाठी ऑरेंज अलर्ट

### अनेक जिल्ह्यांमध्ये उंच लाटा आणि नदी पातळीवर लक्ष

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील पावसाळा जोर धरत आहे, त्यामुळेपुणे घाट परिसरासाठी पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्टजाहीर करण्यात आला आहे. भारतीय हवामान विभाग (खचू) आणि राष्ट्रीय रिमोट सेन्सिंग केंद्राच्या सततच्या अंदाजानुसार प्रशासन सर्व जिल्ह्यांना सतर्क राहण्याचे निर्देश देत आहे. मागील ७ दिवसात राज्यात२३९ हवामान अलर्टपाठवून२५३ कोटी नागरिकांपर्यंत डचड द्वारे माहिती पोहोचवण्यात आली आहे.

ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी उंच लाटांचा इशारा जाहीर केला गेला आहे. भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र ने ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी ३ ते ३.७ मीटर लाटांचे, तर रायगड व रत्नागिरीसाठी २.७ ते ३.७ मीटर उंच लाटा येण्याचा इशारा दिला आहे. यामुळे मच्छीमारांनी समुद्रात जाणे टाळावे, किनाऱ्याजवळ सतर्क राहावे असे प्रशासनाचे निर्देश आहेत.

नदी पातळी देखील चिंताजनक स्थितीत आहे. रत्नागिरीतील जगबुडी, रायगडमधील अंबा, ठाणे जिल्ह्यातील काळू नदी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदी इशारा पातळी ओलांडली आहे. पुणे जिल्ह्यात मुळशी तालुका, पडळघर येथील दरड प्रवण भागातील ९ कुटुंब आणि रामनगर येथील २ कुटुंब लवासा सिटीमध्ये स्थलांतरित केले गेले आहेत. तसेच घोडेगाव, आंबेगाव तालुक्यातील ५ नागरिक आपत्ती मित्रांच्या मदतीने रेस्क्यू बोटीच्या सहाय्याने सुरक्षित बाहेर काढले गेले आहेत.शिवणे–नांदेडसिटी, भिडे पुल, रजपूत झोपडपट्टी ते मनपा मुख्यालय रस्ते सुरक्षेसाठी बंद करण्यात आले आहेत, तर नांदेडमधील स्थलांतरित नागरिकांसाठी चिकित्सा शिबीर आणि भोजनाची व्यवस्था देखील प्रशासनाने केली आहे.

# राष्ट्रीय अवकाश दिन निमित्त सायन्स पार्क येथे विविध उपक्रम

### २३ रोजी व्याख्यान, मून वॉक, मेक अँड टेकसह विज्ञानप्रेमींसाठी खास कार्यक्रम

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सायन्स पार्क आणि तारामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, सायन्स एज्युकेशन ट्रस्ट, इस्रो–एसपीपीयू एसटी आणि भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (पुणे) यांच्या सहकार्याने २३ ऑगस्ट २०२५ रोजी 'राष्ट्रीय अवकाश दिन' साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त महापालिकेच्या सायन्स पार्क येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अवकाश दिनाची या वर्षीची थीम 'आर्यभट्ट ते गगनयान – प्राचीन ज्ञान ते अनंत शक्यता' अशी आहे. भारताच्या अवकाश संशोधन प्रवासाचा आणि त्याच्या उज्वल भविष्याचा आढावा यानिमित्ताने घेतला जाणार आहे. त्या अनुषंगानेच सायन्स पार्क येथे २३ ऑगस्ट २०२५ रोजी विविध उपक्रम होणार आहेत. यामध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (पुणे) तर्फे विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना चंद्रावर चालण्याचा अनुभव मिळावा यासाठी 'व्हर्च्युअल रिॲलिटी मून वॉक' हा विशेष उपक्रम देखील आयोजित करण्यात आला आहे. तसेच 'मेक अँड टेक' उपक्रमांतर्गत सहभागी होऊन नागरिक अवकाशाशी निगडित मॉडेल्स तयार करू शकणार आहेत. ज्येष्ठ इस्रो शास्त्रज्ञ ए. के. सिन्हा यांचे 'इंडिया इन्टू स्पेस – इस्रो टुवड्र्स नॅशनल प्रॉस्पेरिटी' या विषयावरील व्याख्यान सकाळी ११:३० ते दुपारी १२:३० या वेळेत तारांगण सभागृहात होणार आहे. ए. के. सिन्हा यांनी ३६ वर्षे इस्रोमध्ये काम केले असून भारताच्या अंतराळ संशोधनात त्यांचा वाटा आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.




> राष्ट्रीय अवकाश दिन हा आजच्या तरुण पिढीला विज्ञानाची प्रेरणा देणारा दिवस आहे. पिंपरी चिंचवड सायन्स पार्कने नेहमीच विज्ञानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे. यंदा राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त 'आर्यभट्ट ते गगनयान' हा आपल्या देशाचा प्रवास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सायन्स पार्कमध्ये आयोजित केलेले उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरतील. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाप्रती जिज्ञासा निर्माण होईल.
>
> · शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

> 'व्हर्च्युअल रिॲलिटी मून वॉक', मॉडेल मेकिंगसारख्या अनुभवातून मुलांना आणि नागरिकांना विज्ञान शिकणे अधिक रंजक होईल. तसेच ए. के. सिन्हा यांसारख्या अनुभवी शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि भारताच्या अंतराळ संशोधनात योगदान देण्याची प्रेरणा मिळेल.

> पिंपरी चिंचवड सायन्स थीम पार्कला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी अंतराळ समजून घेण्याची संधी राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त मिळणार आहे. या संधीचा लाभ घेऊन ते भारताच्या अंतरिक्ष प्रवासाच्या या ऐतिहासिक वाटचालीत सहभागी होऊ शकतात.
>
> – प्रविण तुपे, संचालक, सायन्स पार्क

# दिल्लीत अमित शहांवर दगड फेकला; नेमकं काय घडलं?

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांना आपली खुर्ची सोडावी लागेल याबाबतचे नवे विधेयक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल संसदेत मांडलं. अमित शाह यांच्या या नव्या बिलानंतर सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. विरोधकांनी या विधेयकाला तीव्र विरोध करत गोंधळ घालण्यास सुरुवात केली. अमित शाह यांचे भाषण सुरु असतानाच विरोधी पक्षातील एका खासदाराने विधेयकाची प्रत फाडून अमित शहांवर फेकली. परंतु अमित शहांवर दगडही मारण्यात आले असा गंभीर आरोप भाजप खासदार कंगना राणावत यांनी केला आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

लोकसभेत विरोधकांच्या गदारोळानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना कंगनाने विरोधी पक्षाच्या नेत्यांवर मोठा आरोप केला. अमित शहा विधेयक मांडत होते, तेव्हा विरोधी पक्षाच्या खासदारांनी त्यांचा माइक ओढण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी विधेयकाची प्रत फाडून शहांवर फेकली. एवढच नव्हे तर काही खासदारांनी त्यांच्यासोबत दगडही आणले होते, जे त्यांनी कागदासह अमित शहा यांच्या तोंडावर फेकले



# पुणे महापालिकेतील माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुरज कुलकर्णी सेवानिवृत्त

### सेवापूर्ती निमित्त विशेष गौरव समारंभाचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत असताना विद्यार्थ्यांना यशस्वी नागरिक म्हणून उभे करण्यासाठी पायाभरणी करणारे आदर्श शिक्षक मुख्याध्यापक म्हणून सुरज कुलकर्णी यांचा गौरव करावा लागेल, असे मत राजकीय विश्लेषक ॲड. भाऊसाहेब आजबे यांनी व्यक्त केले. पुणे महापालिकेच्या माध्यमिक विभागातील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन शाळेचे मुख्याध्यापक सुरज कुलकर्णी यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक ॲड. अविनाश साळवे, युवा उद्योजक सुरेंद्र पठारे, निवृत्त महापालिका उपायुक्त वसंत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ.दिलीप गरुड, माजी शिक्षणाधिकारी पोपट काळे,माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी दामोदर उंडे, विठ्ठल भरेकर,सामाजिक कार्यकर्ते निखिल गायकवाड यांच्यासह कुलकर्णी कुटुंबातील सदस्य मित्रपरिवार व मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी आशा उबाळे होत्या. ३७ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेत सुरज कुलकर्णी यांनी इंग्रजी या विषया सोबतच विद्यार्थ्यांना शालेय शिस्त,बाह्य परीक्षा, आर. एस.पी. तसेच सांस्कृतिक व क्रीडा या विषयांमध्ये बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांचे असंख्य विद्यार्थी आज देश परदेशात उच्चपदस्थ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यासोबतच जनगणना,मतदान या महत्वपूर्ण शासकीय कार्यामध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून त्यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. भारतीय संविधान जनजागृती,व्यसनमुक्ती,अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री–पुरुष समानता या विषयांवर देखील सरांनी सक्रिय कार्य केलेले आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय सेवा केंद्रांमध्ये सुरक्षिततेचा संकल्प!

### अग्नितपासणी, परवानगीपत्र व सुरक्षिततेसाठी प्रशिक्षण वर्ग संपन्न

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व रुग्णालय आणि वैद्यकीय उपचार केंद्रांमध्ये अग्नितपासणी (फायर ऑडिट) आणि अग्निसुरक्षा नियमपालन प्रमाणपत्र (फायर सेफ्टी कंप्लायन्स सर्टिफिकेट) प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी यशवंतराव चव्हाण रुग्णालयातील चाणक्य सभागृहात प्रशिक्षण वर्ग यशस्वीरीत्या पार पडला.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. अग्निशमन विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, उप अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी अंजली ढोणे यांनी अग्निसुरक्षा, अग्नितपासणी, नियमपालन प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया आणि कायदेशीर तरतुदी अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये अग्निशमन परवानगीपत्र (फायर एनओसी) काढण्यासंदर्भात सविस्तर माहिती प्रशिक्षण कार्यक्रमात देण्यात आली. अग्निशमन परवानगीपत्रासाठी कसा अर्ज करायचा, यासाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर कोणती आवश्यक कागदपत्रे अपलोड करायची, याबाबत सहाय्यक आयुक्त ढाकणे व उप अग्निशमन अधिकारी चिपाडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच ही प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी यासाठी अग्निशमन विभाग आणि वैद्यकीय विभागाचा परस्पर समन्वय कसा असावा, याबाबतही माहिती देण्यात आली. तसेच ज्यांनी आधीच अग्निसुरक्षा नियमपालन प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केले आहेत, त्यावरही चर्चा करण्यात आली.

> रुग्णसेवा करणाऱ्या प्रत्येक केंद्रासाठी सुरक्षा ही प्राथमिक जबाबदारी आहे. अग्निसुरक्षा नियमपालनाची योग्य अंमलबजावणी झाल्यास केवळ कायदेशीर पूर्तता होत नाही, तर रुग्ण आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची खात्री मिळते. अग्निशमन विभागाच्या सहकार्याने घेतलेले हे प्रशिक्षण त्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.
>
> – डॉ. लक्ष्मण गोफणे,
> आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्यसेवा केंद्रांमध्ये अग्निसुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अग्नितपासणी व परवानगीपत्र प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आम्ही हे प्रशिक्षण आयोजित केले होते. या उपक्रमामुळे डॉक्टर आणि आमच्या विभागामध्ये समन्वय वाढेल आणि सर्व आरोग्य केंद्रे कायदेशीर निकषांचे पालन करून अधिक सुरक्षित होतील.
>
> – उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## महत्वाचे...

### खडकी बसमध्ये गर्दीत सोन्याचे मंगळसुत्र चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

बावधन, पुणे येथील ४० वर्षीय महिला प्रवासी १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८:३० वाजता वाकडेवाडी येथील एस. टी. मध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत तिचे जवळील ६६,००० रुपयांमूल्याचे सोन्याचे मंगळसुत्र चोरी करून नेले. या प्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून, आरोपी अद्याप अज्ञात आहे. पोलीस निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे आणि अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे.

### विमाननगर चौकात मोबाईल चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

रामवाडी-नगर रोड, पुणे येथील ४१ वर्षीय फिर्यादी त्यांच्या चारचाकीने १९ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७ वाजता विमाननगर चौकातून जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना थांबवले. अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना त्यांच्या पायावरून गाडी गेल्याचे दाखवून बोलण्यात गुंतवले आणि यावेळी गाडीतील १,४५,००० रुपयाचे दोन मोबाईल चोरी करून नेले. तपास सुरू असून, आरोपी अद्याप फरार आहेत.

### वडाचीवाडी दुकानातून रोख रक्कमेची चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

वडाचीवाडी, पुणे येथील मॅक्स गिफ्ट अँड स्टेशनरी शॉपमध्ये ११ ऑगस्ट रोजी दुपारी १२:२४ वाजता एका अनोळखी इसमाने प्रवेश करून गल्ल्यात ठेवलेली ४०, ००० रुपयांची रोख रक्कम चोरी करून नेली. पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला असून, आरोपी अद्याप फरार आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### चाकण फसवणूक प्रकरण; युवकाकडून ७९,९९७ रुपये घेतले गेले

**पुणे । प्रतिनिधी**

अजय कुमार हेमंत कुमार (वय २५, व्यवसाय-नोकरी) हे देवलिला कॉम्प्लेक्स, रूम नं. ३९, आयफेल सिटी, चाकण, ता. खेड, जि. पुणे येथे राहतात. याप्रकरणी फिर्यादींच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. सदर आरोपी, दिपक बजरंग पवार (पूर्ण नाव अद्याप अज्ञात) यांनी स्वतः ला भारतीय लष्करातील जवान असल्याचे भासवून त्यांनी तीन महिन्यांचे रूम भाडे एकदाच पाठवण्याचे आश्वासन देऊन फिर्यादींच्या यूपीआय आयडीवरून एकूण ७९,९९७ रुपये गुगल पेच्या माध्यमातून मागवले. ही रक्कम घेतल्यानंतर आरोपी फरार झाला असून अद्याप अटक झालेली नाही.

### भरधाव वाहन अपघातात ३१ वर्षीय युवकाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे नाना पेठ येथील ३६ वर्षीय फिर्यादीच्या ताब्यातील वाहन चालकाने भरधाव गतीने वाहन चालवताना उरळी देवाची ता. हवेली, पुणे येथील मंतरवाडी कचरा डेपो समोर फिर्यादींच्या चुलत भाऊ, ३१ वर्षीय गणेश ज्ञानेश्वर जाधव यांना धडक दिली. या धडकेमुळे जाधव गंभीर जखमी झाले आणि अपघाताच्या ठिकाणीच मृत्यू झाला. घटनास्थळी वाहन चालक थांबले नाही आणि अपघाताची माहिती देखील दिली नाही. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

# ९० हजार कोटींच्या थकबाकीसाठी कंत्राटदार आक्रमक

## सरकारविरोधात न्यायालयीन लढाईची तयारी, ८०० ते ९०० कंत्राटदार आंदोलनात सहभागी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये थकीत असलेली ९० हजार कोटी रुपयांची बिले त्वरित द्यावीत, यासाठी सरकारी कंत्राटदारांनी मंगळवारी भरपावसात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. या आंदोलनात बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया पुणे सेंटरच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य कॉन्ट्रॅक्टर संघटना, राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना, राज्य हॉटमिक्स असोसिएशन, राज्य मजूर सहकारी संस्था, पुणे कॉंट्रॅक्टर्स असोसिएशन आदी संघटनांचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



डोक्यावर धो-धो पाऊस कोसळत असतानाही कंत्राटदारांनी आपल्या हक्काच्या पैशांसाठी दोन तास धरणे आंदोलन केले. पुण्यासह राज्याच्या इतर भागातून सुमारे ८०० ते ९०० कंत्राटदार या आंदोलनात सहभागी झाले होते. 'राज्यकर्ते जोमात, कंत्राटदार कोमात', 'रुपया नाही तिजोरीत, मंत्री मात्र मुजोरीत', 'राज्यशासन कंत्राटदारांना देईना पैका, मंत्री माझ्याच गप्पा ऐका', 'भीक नको हक्क हवाय, कंत्राटदारांना न्याय हवाय', 'नियोजनशून्य कारभारी, कंत्राटदार झाला भिकारी' अशा घोषणा देत कंत्राटदारांनी सरकारच्या दिरंगाई धोरणाचा निषेध केला.

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे पुणे सेंटर अध्यक्ष अजय गुजर, राज्य अध्यक्ष जगन्नाथ जाधव, महाराष्ट्र राज्य कॉन्ट्रॅक्टर संघटनेचे अध्यक्ष सुरेश कडू, पुणे कॉंट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र भोसले, राज्य अभियंता संघटनेचे अध्यक्ष शैलेश खैरे, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष अमित शिवतारे, राज्य मजूर सहकारी संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय शेलार, राज्य हॉटमिक्स असोसिएशनचे अध्यक्ष एम. एस. पंजाबी यांच्या शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकारी ज्योती कदम यांना मागण्यांचे निवेदन दिले.

अजय गुजर म्हणाले, राज्य सरकारच्या विविध खात्यांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटदारांची ९० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक बिले थकीत आहेत. लाडकी बहीण योजनेला सरकारकडे पैसे आहेत. मात्र, आम्हाला द्यायला पैसे नाहीत. आमच्या हक्काचे पैसे त्या योजनेसाठी वळवण्यात आले आहे. राज्यभरातील कंत्राटदार कंगाल झालेला आहे. त्यामुळे सरकारने कंत्राटदारांना वाचवण्यासाठी त्वरित बिले द्यायला हवीत.

जगन्नाथ जाधव म्हणाले, थकीत बिलाच्या कारणावरून काही दिवसांपूर्वीच सांगलीतील हर्षल पाटील या तरुण कंत्राटदाराने आत्महत्या केली. मात्र सरकारला अजूनही जाग आलेली नसून, थकीत बिलांवर चकार शब्द काढला जात नाही. सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कंत्राटदारांचे पैसे देऊन त्यांना आत्महत्या करण्यापासून रोखावे. अन्यथा आम्हाला न्यायालयाचा दरवाजा ठोठवावा लागेल.

रवींद्र भोसले म्हणाले, कंत्राटदारांची राज्य सरकार यमाच्या भूमिकेत दिसत आहे. काम करूनही आमचे पैसे फाईलींमध्ये अडकून पडले आहेत. सर्व कंत्राटदार कर्जबारी झाले आहेत. त्यांची आर्थिक व मानसिक अवस्था बिघडत चालली आहे. शासन आमच्या भावनांशी खेळत आहे. हा खेळ थांबवून पहिल्या टप्प्यात किमान ५० टक्के तरी पैसे द्यावेत.

सुरेश कडू म्हणाले, सरकारच्या तिजोरीत पैसे नसतानाही विकासकामांच्या निविदा काढून कंत्राटदारांना कर्जबाजारी करण्याचे काम सुरु आहे. पैसे नसतील तर फसव्या योजना आणू नका, निविदा काढून उसने अवसान आणू नका. कंत्राटदारांची पहिली बाकी द्या आणि मग तुम्हाला ज्या काही नव्याने निविदा काढायच्या त्या काढा. नाहीतर कंत्राटदार देशोधडीला लागेल.

### महाळुंगेमध्ये विनापरवाना देशी बनावटीचा कट्टा जप्त; आरोपी अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

महाळुंगे पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ६१५/२०२५ अंतर्गत शस्त्र अधिनियम १९५९ कलम ३ (२५) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७(१)/१३५ प्रमाणे एक गंभीर घटना घडली आहे. २० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५:२० वाजता हंन्टसमन सर्कल, भामचंद्र डोंगराजवळ, ता. खेड, जि. पुणे येथे आरोपीसंतोष दशरथ वायकर (वय ३१, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन) याच्याकडून विनापरवाना ४१,००० रुपयांचा देशी बनावटीचा गावठी कट्टा जप्तकरण्यात आला.

या घटनेत आरोपी सोबतवेदांत मच्छिंद्र मेदगे (वय १९, मु. पो. अवधर) देखील आढळून आला. पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने आधी निर्गमित केलेल्याप्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघनया घटनेत झालेले आढळले. सदर आरोपीला अटक करण्यात आली असून, पोलीस उपनिरीक्षकखरातयांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### शिरगावमध्ये विनापरवाना गावठी पिस्तूल आणि काडतूस जप्त; आरोपी अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

शिरगाव पोलीस ठाण्यात २५५/२०२५ क्रमांकाने भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७(१)(३) आणि १३५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

२० ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री १२:१५ वाजता शिरगाव ते कासारसाई रोडवर, गोडुंबरे फाटा, जय मल्हार ड्रायक्लीनर दुकाना समोर पोलीसांनी सचिन रमेश बंदीछोडे (वय २४, रा. म्हाळसकरवाडी, वडगाव, ता. मावळ, जि. पुणे) यांच्या ताब्यातून ४०,००० रुपयांमूल्याचा देशी बनावटीचा गावठी पिस्तूल आणि १,००० रुपयांमूल्याचा जिवंत काडतूस (पितळी राऊंड) जप्त केला.

सचिन बंदीछोडे या आरोपीला विनापरवाना आणि बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याच्या प्रकरणात अटक करण्यात आली आहे.

# पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदार यादी संदर्भातील अधिकृत माहिती मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी संदर्भातील माहिती मिळविण्यासाठी विशेष मागणी करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी पुणे शहरातील सर्व विधानसभा मतदारसंघनिहाय नियुक्त बी.एल.ओ. यांची अधिकृत यादी, त्यांचे संपर्क क्रमांकासह, विनंती करणाऱ्यांना प्रदान करण्याची मागणी करण्यात आली आहे.



**पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हा निवडणुक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी मा. मीनल कळसकर यांची भेट घेऊन पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादी संदर्भातील मुद्द्यांबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले.**

याशिवाय, पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी कोणत्या तारखेपर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे आणि ती यादी कोणत्या दिवशी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे, याची सविस्तर माहिती देखील मागवण्यात आली आहे. मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नवीन नाव समाविष्ट करण्याची परवानगी आहे का, असल्यास अंतिम तारीख आणि प्रक्रिया याबाबतही स्पष्टता आवश्यक आहे. दुबार नावे आढळल्यास ती वगळण्याची कार्यवाही आपल्या कार्यालयाच्या माध्यमातून केली जाईल का? तसेच एकदा नाव वगळल्यानंतर त्याचा पुन्हा समावेश करण्याबाबतची धोरणात्मक भूमिका काय आहे, याची माहिती देखील मागवण्यात आली आहे.

# महामहोपाध्याय पुरस्कार डॉ. कपोते यांना प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीनेप्रतिष्ठेचा व मानाचा महामहोपाध्याय पुरस्कारप्रसिद्ध व ज्येष्ठ कथक नर्तक, संगीत नाटक अकादमी अवार्डी डॉ. नंदकिशोर कपोते यांना सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नर्तिका पद्मविभूषण, खासदार डॉ. सोनल मानसिंह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या वेळी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सुर्यवंशी, सचिव पं. सुधाकर चव्हाण, रजिस्ट्रार विश्वास जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार सोहळा तेरणा ऑडिटोरियम, नेरुळ, नवी मुंबई येथे उत्साहात संपन्न झाला.




डॉ. नंदकिशोर कपोते यांना या पूर्वी भारत सरकार चा संगीत नाटक अकादमी राष्ट्रीय पुरस्कार माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते मिळाला आहे. तसेच या शिवाय महाराष्ट्र शासनाचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार, शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, पुणे महानगर पालिकेचा बालगंधर्व पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या स्मरणार्थ हा महामहोपाध्याय पुरस्कार अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या दीक्षांत समारोहात देण्यात आला. महामहोपाध्याय पुरस्कार हा कलाक्षेत्रातील सर्वोच्च सन्मान मानला जातो.

# बालगंधर्व परिवार ट्रस्टच्या वतीने पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

बालगंधर्व परिवार ट्रस्ट, महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने पाककला स्पर्धा आणि सभासदांना अपघाती विमा पॉलिसी वाटप चा कार्यक्रम पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र, पुणे येथे संपन्न झाला.

यावेळी बालगंधर्व परिवाराचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रपट निर्माते अमित पोतदार, पाककला स्पर्धेचे परीक्षक किशोर सरपोतदार, मास्टर शेफ सर्वेश जाधव, भारती मेढी, अलविरा मोशन पिक्चर्स च्या दिपाली कांबळे, पुणे म.न.पा.चे चव्हाण, परिवाराचे कार्यकारिणी सदस्य अरुण गायकवाड, विनोद धोकटे, विनायक कडवळे, हरीश गुळीग, शंकर घोडेराव, मिटठू पवार, उमेश मोडक उपस्थित होते.

या प्रसंगी प्रास्ताविक अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी केले. तसेच परिवाराचे सचिव चित्रसेन भवार आणि परिवारातील महिला कार्यकारिणी सदस्य वर्षा संगमनेरकर, वनमाला बागूल, शिल्पा भवार, स्वाती धोकटे, हेमा कोरभरी, मृणाल लोणकर यांनी श्रावण सोहळा या कार्यक्रमात गीत आणि नृत्याने धमाल केली.पाककला स्पर्धेच्या विजेत्या महिला उल्का ओझरकर, वर्षा दाभाडे, सीमा नलावडे, मनीषा भावे, सोनाली पाटे, विद्या ताम्हणकर यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात प्रतिनिधिक स्वरूपात ज्येष्ठ कलावंताना विमा पॉलिसी चे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी परिवाराचे खजिनदार अनिल गुंजाळ आणि कार्यकारिणी सदस्य योगेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

### शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने १५ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर पोलीस ठाण्यात ऑनलाइन फसवणुकीचा एक प्रकार समोर आला आहे. हडपसर परिसरातील ३६ वर्षीय एका व्यक्तीची तब्बल १५ लाख ५० हजार ५०० रुपयांची फसवणूक झाली आहे. हा प्रकार २५ मार्च ते १४ मे २०२५ दरम्यान ऑनलाइन माध्यमातून घडला. गुन्हेगाराने शेअर ट्रेडिंगमध्ये चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवून फसवणूक केली.

# सोलापूर-पुणे हायवेवर ५० लाखांचा ट्रक लंपास; कर्नाटकमधील एक अटक, दुसरा आरोपी फरार

**पुणे । प्रतिनिधी**

२४ वर्षीय उत्तर प्रदेशातील तरुणाच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन आरोपींविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २० ऑगस्ट रोजी पहाटे साधारण एक वाजता सोलापूर-पुणे महामार्गावरील दत्त मंदिराजवळ, मनाली रिसॉर्टसमोर घडली.

फिर्यादी हा आपल्या अशोक लेलंड कंपनीच्या बीआर-२४ जीडी-२७७८ या क्रमांकाच्या ट्रकसह बालाजी सिमेंट वेअरहाऊस परिसरात थांबला असताना आरोपींनी त्याला अडवले. त्यातील मल्लीकार्जुन शांताप्पा अवंती (३३, रा. कोडला, ता. शेडम, जि. गुलबर्गा, कर्नाटक) व अशोक शिवाप्पा राठोड (३९, रा. पद्मसागर कॉलनी, योगापुर रोड, जि. विजापूर, कर्नाटक) या दोघांनी मिळून फिर्यादीला शिवीगाळ केली. यावेळी त्याच्या ट्रकची चावी जबरदस्तीने हिसकावून घेतली व त्याला जीवघेणी धमकी देत ट्रक लंपास केला. सदर ट्रकाची किंमत तब्बल ५० लाख रुपये असल्याने या प्रकरणाने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी हालचाली सुरू असून अशोक शिवाप्पा राठोड याला अटक करण्यात आली आहे. तर दुसरा आरोपी मल्लीकार्जुन शांताप्पा अवंती याचा शोध सुरू आहे.

# फोनवर कायदेशीर सल्ला देऊ नका; सर्वोच्च न्यायालयाचे वकिलांना स्पष्ट मार्गदर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

वकिल आणि क्लायंट यांच्यातील नातं पूर्णपणे विश्वासावर उभं असतं. क्लायंट आपले प्रश्न, समस्या व गुंतागुंती वकिलासमोर मोकळेपणाने मांडतो. मात्र, हा संवाद कितपत सुरक्षित आहे? सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच वकिलांना इशारा दिला आहे की, फोनवर दिलेला कायदेशीर सल्ला भविष्यात पुरावा म्हणून वापरला जाऊ शकतो, आणि त्यामुळे वकिल स्वतःच ट्रायलला सामोरे जाऊ शकतो.



**फोनवर सल्ला देण्याचा धोका**

फोनवर दिलेल्या संभाषणाचे रेकॉर्डिंग न्यायालयात पुरावा म्हणून सादर होऊ शकते. आजच्या डिजिटल युगात प्रत्येक मोबाईलमध्ये कॉल रेकॉर्डिंगची सुविधा उपलब्ध आहे. क्लायंट किंवा तिसरा कोणताही व्यक्ती हा संवाद रेकॉर्ड करून ठेऊ शकतो. नंतर तो पुरावा पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलम ६५इ अंतर्गत न्यायालयात सादर केला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत वकिलाने अनावधानाने दिलेला सल्ला त्याच्या विरोधात वापरला जाऊ शकतो. त्यामुळे स्वतः च्या सुरक्षिततेसाठी फोनवर सविस्तर कायदेशीर चर्चा टाळणे आवश्यक आहे.

**अपूर्ण माहितीमुळे चुकीचा सल्ला जाण्याची शक्यता**

फोनवर क्लायंटकडून सर्व तथ्य, कागदपत्रे किंवा परिस्थिती समजून घेणं कठीण असतं. अर्धवट माहितीच्या आधारे दिलेला सल्ला चुकीचा ठरू शकतो. क्लायंट त्या चुकीच्या सल्ल्यावर कृती करून मोठ्या संकटात सापडल्यास जबाबदारी थेट वकिलावर येऊ शकते. प्रत्यक्ष भेटीत, कागदपत्र तपासून आणि संपूर्ण परिस्थिती ऐकून दिलेला सल्ला नेहमीच अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह ठरतो.

**वकिल अधिनियम, १९६१ आणि भारत बार कौन्सिल नियमावली नुसार गोपनीयतेला धोका**

वकिल अधिनियम, १९६१ आणि भारत बार कौन्सिल नियमावली नुसार, वकिलाने क्लायंटची माहिती व संवाद गुप्त ठेवणे हे त्याचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य आहे. फोनवर झालेला संवाद सहज रेकॉर्ड किंवा फॉरवर्ड होऊ शकतो, ज्यामुळे गोपनीयतेला धोका निर्माण होतो. सर्व वकिलांनी स्वतः च्या सुरक्षिततेसाठी आणि क्लायंटच्या हितासाठी फोनवर सविस्तर कायदेशीर सल्ला न देता, प्रत्यक्ष भेटीत सल्ला देणे अधिक योग्य ठरेल, असा सर्वोच्च न्यायालयाचा इशारा आहे.

### निगडीत बीएसएनएल कामाच्या अपुऱ्या सुरक्षा साधनांमुळे तीन कामगारांचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

निगडी पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ३७३/२०२५ अंतर्गत गंभीर अपघात उघडकीस आला आहे. १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २:४५ वाजता निर्मल व्हिला समोर, शामराव विठ्ठल बँकेजवळ, निगडी प्राधिकरण, पुणे येथे बीएसएनएल कंपनीच्या ऑप्टिकल फायबर पॉईंट बसविण्याच्या कामादरम्यान दुर्घटना घडली.

रमेश शिवाजी पाटील (वय ४६, बीएसएनएल, टी. आय.पी.) यास आरोपी म्हणून अटक करण्यात आली आहे. या कामाची माहिती कंपनीतील संबंधित अधिकाऱ्यांना होती, परंतु डक्ट बर्याच दिवसांपासून बंद अवस्थेत असल्यामुळे काम करताना सुरक्षेची साधने पुरवणे अत्यंत गरजेचे होते.

तरीही पाटीलने तांत्रिक कौशल्य असलेले कामगार न ठेवता आणि सुरक्षेची साधने न पुरवता चार कामगार – दत्तात्रय विजयकुमार व्हनाळे, लखन उर्फ संदीप आशरुवा धावरे, साहेबराव संभाजी गिरशेट आणि बाबासाहेब वाघ – घटनास्थळी कामासाठी पाठवले. काम करताना योग्य सुरक्षा न मिळाल्यामुळे या तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये संताप पसरवला असून, पोलीस आणि बीएसएनएल अधिकारी यांच्यावर चौकशी सुरू आहे.

काम करताना डक्टमध्ये उतरलेल्या कामगारांना श्वास घेण्यास त्रास होऊन दत्तात्रय विजयकुमार व्हनाळे, लखन उर्फ संदीप आशरुवा धावरे आणि साहेबराव संभाजी गिरशेट यांचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे.